**विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, मुंबई विभाग, मुंबई.**
जवाहर बालभवन, तळमजला, नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड, मुंबई - ४०० ००४
दुरध्वनी :- ०२२-२३६३००८१/८६ ई-मेल : dydemumbai@yahoo.com

क्र. शिउसं/उमाबि/इ.११वी प्रवेश/२०२४/ 5423 दिनांक :- 13 JUN 2024

प्रति,

प्राचार्य / मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये व उच्च माध्यमिक शाळा,
(अनुदानित, विना अनुदानित, स्वयंअर्थसहाय्यीत)
जिल्हा ठाणे / पालघर / रायगड (M.M.R. क्षेत्र वगळून)

**विषय :- इयत्ता ११वी प्रवेशाचे वेळापत्रक शैक्षणिक वर्ष २०२४-२५**
**(मुंबई महानगर विकास क्षेत्राबाहेरील)**

उपरोक्त विषयाबाबत अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा ऑनलाईन निकाल जाहीर झाला आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या विद्यार्थ्यांना **मंगळवार दिनांक ११.०६.२०२४** रोजी पासून गुणपत्रक मिळाले आहे.

इ. ११ वी ऑफलाईन प्रवेश प्रक्रिया मुंबई, ठाणे व रायगड जिल्हयातील मुंबई महानगर विकास प्राधिकरण (MMR) हे क्षेत्र वगळून सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक विद्यालयांना लागू राहिल. सबब **सन २०२४-२५ च्या इयत्ता ११वी प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक सोबत जोडले आहे**. त्यानुसार इयत्ता ११वी प्रवेश प्रक्रिया सन २०२४-२५ बाबत खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. इयत्ता ११वी प्रवेश प्रकिया राबवत असतांना शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय दिनांक २६ जून १९९७ मधील तरतूदी व त्यानंतर वेळोवेळी शासनाने प्रवेशासंबंधी निर्गमित केलेल्या शासन आदेश व शासन पत्रांतील तरतूदींचे पालन करणे.
२. इयत्ता ११वी प्रवेश गुणवत्ता व प्रचलित नियमानुसार वैधानिक (घटनात्मक) व विशेष आरक्षणांची टक्केवारी विचारात घेऊन दिले जातील याची दक्षता घ्यावी.
३. अनुदानित तुकड्यातील कमाल विद्यार्थी क्षमता पूर्ण झाल्यानंतरच क्रमाने विना अनुदानित तुकड्यामधील प्रवेश क्षमता पूर्ण करावी.
४. भौतिक सुविधा उपलब्धतेच्या प्रमाणातच प्रवेश देणे बंधनकारक राहील. मंजूर प्रवेश क्षमता तसेच भौतिक सुविधांच्या उपलब्धतेपेक्षा जादा प्रवेश दिल्यास सदरच्या जादा प्रवेशास मान्यता दिल्या जाणार नाही. सदर जादा प्रवेश दिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.
५. ऑफलाईन प्रवेश क्षेत्रातील राज्यमंडळ संलग्न कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी कोणत्याही मंडळातून इ. १० वी किंवा समकक्ष परिक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांस इ. ११ वी ऑफलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी होता येईल.
६. राज्य मंडळाच्या इ. ११ वी मध्ये प्रवेशासाठी इ. १० वी किंवा समकक्ष परीक्षा इंग्रजी विषयासह किमान पाच विषय घेऊन उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.
७. इ.११ वी मध्ये विज्ञान शाखा निवडता येण्यासाठी विद्यार्थी ज्या मंडळामार्फत इ १०. वी उत्तीर्ण झाला असेल त्या मंडळाच्या निकषानुसार तो विज्ञान विषयात उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
८. इ.११ वी गणित विषय निवडता येण्यासाठी इ.१० वी मध्ये विद्यार्थ्यांने सामान्य गणित विषय निवडला असेल असे विद्यार्थी कोणत्याही शाखेमध्ये प्रवेश घेऊ शकतात, मात्र त्यांना गणित विषय घेता येणार नाही.
९. इ.११ वी मध्ये द्विलक्षी विषय निवडता येण्यासाठी इ.११ वी मध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व गणित हे तीन विषय घेतलेले नसताना तांत्रिक गटातील द्विलक्षी अभ्यासक्रमास प्रवेश देता येत नाही आणि इ. ११ वी मध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र हे तीन विषय घेतलेले नसताना पॅरामेडीकल गटातील द्विलक्षी अभ्यासक्रमास प्रवेश देता येत नाही.

१०. इयत्ता ११वी प्रवेशाबाबत पालक व विद्यार्थी यांना नाहक त्रास होणार नाही व कोणत्याही प्रकारची तक्रार या कार्यालयास प्राप्त होणार नाही याची दक्षता घ्यावी. आपल्या जिल्ह्यातील इयत्ता ११वी प्रवेश प्रक्रिया शांततेत व सुरळीत पार पाडणेचे दृष्टीने योग्य ते नियोजन करावे. प्रवेश प्रक्रिया कमीत-कमी वेळेत पूर्ण होण्यासाठी सर्व घटकांना सहाय्य करण्याचे निर्देश देण्यात यावेत.

(संदीप संगवे)
विभागीय शिक्षण उपसंचालक
मुंबई

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :-**

१. मा. आयुक्त (शिक्षण) शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे १
२. मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे १

## इयत्ता ११वी प्रवेशाचे वेळापत्रक शैक्षणिक वर्ष २०२४-२५
## (मुंबई महानगर विकास क्षेत्राबाहेरील)

| अ.क्र. | दिनांक | कार्यवाही |
|---|---|---|
| १ | दि. १४.०६.२०२४ ते दि. २०.०६.२०२४ | प्रवेश अर्जाचे वितरण व संकलन |
| २ | दि. २१.०६.२०२४ व दि. २२.०६.२०२४ | प्रवेश अर्जाची छाननी, तपासणी व गुणवत्तेनुसार निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करणे |
| ३ | दि. २४.०६.२०२४ | दुपारी ३.०० वाजेपर्यंत निवड यादी व प्रतिक्षा यादी सूचना फलकावर प्रदर्शित करणे |
| ४ | दि. २५.०६.२०२४ ते ०१.०७.२०२४ | निवड यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश देणे. |
| ५ | दि. ०२.०७.२०२४ ते दि. ०६.०७.२०२४ | प्रवेश शिल्लक असल्यास प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना मूळ कागदपत्रांच्या आधारे प्रवेश देणे. |
| ६ | दि. ०८.०७.२०२४ ते १०.०७.२०२४ | दुस-या प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश शिल्लक असतील तर मूळ कागदपत्रांच्या आधारे प्रवेश देणे. |

(संदीप संगवे)
विभागीय शिक्षण उपसंचालक
मुंबई